वाचा :- १) मा.सं.म.खोलगाडगे कक्ष अधिकारी ,महा.शासन यांचे पत्र दिनांक २८ सप्टेंबर २०१८
२) मा.सं.म.खोलगाडगे कक्ष अधिकारी ,महा.शासन यांचे पत्र दिनांक ६ जुलै २०१९
३) पंचायत विभाग यांचे पत्र क्र.११८१दि. २१/३/२२
४) मा.आयुक्त,अमरावती विभाग,अमरावती यांचे पत्र क्र. ९०६ दि.२० मे २०२२
५) या कार्यालयाचे आदेश क्रमांक २४३८दिनांक ८ जुन २०२२
६) अवर सचिव ग्राम विकास विभाग मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०८/आस्था-८दि १४ जुन २०२२

जाक्र/जिपवा/साप्रवि/आस्था-१/ २५६६/२२
कार्यालय जिल्हा परिषद वाशिम
दिनांक:- १५/०६/२०२२

**-:आदेश :-**

शासन अधिसुचना दिनांक १९ ऑगस्ट २००५ मधिल तरतुदीनुसार ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांमधुन १०% कर्मचाऱ्यांची पदे भरणे करीता संदर्भिय आदेश क्रमांक ५ नुसार ग्राम पंचायतची सेवा जेष्ठतेनुसार कागदपत्रे पडताळणी दिनांक १६/६/२०२२ रोजी आयोजीत करण्यात आली आहे.

तथापी शासनाचे संदर्भिय पत्र क्रमांक ६ मधिल निर्देशानुसार शासनाने ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांमधुन पद भरती करणे करीता अहवाल / खुलासा/ स्पष्टीकरण मागविले असुन अहवाल / खुलासा/ स्पष्टीकरण प्राप्त होई पर्यंत सदर भरती प्रक्रीया रहित करणे बाबत निर्देश दिले आहे.

ज्याअर्थी शासनाने ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांमधुन १० टक्के पदे भरणे बाबत अहवाल / खुलासा/ स्पष्टीकरण सादर होई पर्यंत सदर भरती प्रक्रीया रहित करण्याचे निर्देश दिले.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम या आदेशानुसार ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांमधुन १० टक्के पदे भरणे बाबत दिनांक १६/६/२०२२ रोजीची पडताळणीची कार्यवाही पुढिल आदेशापर्यंत स्थगीत करण्यात येत आहे. या बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी नोंद घेवुन तसे आपले अधिनिस्त ग्राम सचिवालय यांना कळवावे व तसा अहवाल सादर करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

प्रति,
१) मा.अध्यक्ष /उपाध्यक्ष जि.प.वाशिम यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा / पंचा) जि.प.वाशिम यांना माहिती व वरील प्रमाणे अमलबजावणी करीता.
३) गट विकास अधिकारी पंचायत समिती-------------------- (सर्व ) यांना माहीतीस्तव.कृपया आपण पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायत कर्मचारी यांना दिनांक १६/६/२०२२ ची कागदपत्रे पडताळणी तसेच भरती बाबतची प्रकीया पुढिल आदेशापर्यंत स्थगीत ठेवणे बाबत सबंधीतांना कळविण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

15/6/22

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम